महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव**
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र. शावैमवरुधा/स्वी. स/ 1296 /२०२६ दि. 07/७/२०२६

**कार्यालयीन आदेश :-**

**विषय**:- अत्यवस्थ रुग्णांच्या औषधोपचार/जीवनसहाय्य उपकरणाने रुग्णांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्यास अशा रुग्णांना सन्मानाने मृत होण्याच्या हक्कांची मार्गदर्शक तत्वे, कार्यपध्दती याची अंमलबजावणीच्या अनुषंगाने न्यायनिर्णयानुसार संस्था स्तरावर प्राथमिक स्तर व व्दितीय स्तरावरील समिती स्थापन करणेबाबत.

**संदर्भ**:- १. शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१२२४/प्र.क्र.४५३/प्रशा-२ दि. १२ डिसेंबर, २०२४
२. क्रसंवैशिवसं/LIVING WILL/शैवि-७/२०२५/४५३, दि.६/७/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्देशानुसार रुग्णांच्या LIVING WILL वर मा.न्यायालयाने विहित केलेल्या कार्यपध्दती व निर्देशानुसार ४८ तासांत कार्यवाही करण्यासाठी संस्था स्तरावर प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती आणि व्दितीय वैद्यकीय मंडळ/समिती स्थापित करण्याविषयी कळविले आहे.

त्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थेच्या स्तरावर खालील समितींचे गठण करण्यात येत आहे.

**प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती**

| अ.क्र | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | **रुग्णांवर उपचार करणारे संबंधित डॉक्टर** | **अध्यक्ष** |
| २. | **डॉ. रामराव मुंढे, सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग** | **सदस्य** |
| ३. | **डॉ. प्रविणकुमार गोवंदे, सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकीत्साशास्त्र विभाग** | **सदस्य** |

**व्दितीय वैद्यकीय मंडळ/समिती**

| अ.क्र | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | **डॉ. तानाजी लाकाळ, वैद्यकीय अधीक्षक** | **अध्यक्ष** |
| २. | **डॉ. ऋषिकेश हरिदास, सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग** | **सदस्य** |
| ३. | **डॉ. रोहन खैराटकर, सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकीत्साशास्त्र विभाग** | **सदस्य** |

वरीलप्रमाणे प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती आणि व्दितीय वैद्यकीय मंडळ/समिती यांनी **मा. सर्वोच्च न्यायलयाच्या न्यायनिर्देशानुसार तथा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१२२४/प्र.क्र.४५३/प्रशा-२ दि. १२ डिसेंबर,** २०२४ या शासन निर्णयाप्रमाणे दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
धाराशिव

**प्रति: - वरिल सर्व संबंधितांस**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

महाराष्ट्र शासन
आयुक्त
आज़ादी का अमृत महोत्सव
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दूरध्वनी (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu...

क्र. सवैशिवसं/LIVING WILL/शैवि-७/२०२५/४५३ दि.: ८/०७/२०२६

प्रति,
संस्थाप्रमुख,
शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय : अत्यवस्थ रुग्णांचा औषधोपचार/जीवनसहाय्य उपकरणाने रुग्णांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्यास अशा रुग्णांना सन्मानाने मृत होण्याच्या हक्कांची मार्गदर्शक तत्वे, कार्यपध्दती याची अंमलबजावणीच्या अनुषंगाने न्यायनिर्णयानुसार संस्था स्तरावर प्राथमिक स्तर व द्वितीय स्तरावरील समिती स्थापन करणेबाबत..

संदर्भ:-

१) वैद्यकीय शिक्षण व औ.द्र.वि. शासन निर्णय क्र.संकीर्ण-१२२४/प्र.क्र.४५३/प्रशा-२, दि.१२/१२/२०२४
२) संचालनालयाचे पत्र क्र.संवैशिवसं/LIVING WILL/शैवि-७/२०२५/४०६, दि.१७/०१/२०२५
३) सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि.क्र. न्यायप्र २०२३/प्र.क्र.२४०/समन्वय-२, दि.२९/११/२०२४

उपरोक्त विषयांकित संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये शासन निर्णय दि.१२/१२/२०२४ मध्ये निर्देशीत केल्यानुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्देशानुसार रुग्णांच्या LIVING WILL वर मा.न्यायालयाने विहित केलेल्या कार्यपध्दती व निर्देशानुसार ४८ तासांत कार्यवाही करण्यांसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात संस्था स्तरावर खालीलप्रमाणे प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती व द्वितीय वैद्यकीय मंडळ/समितीची स्थापना करण्यांत आलेली असून, त्या अनुषंगाने संस्था स्तरावर समिती स्थापन करुन तातडीने कार्यवाही करण्यांत यावी, असे निर्देश सर्व संस्थाप्रमुखांना देण्यांत आलेले आहेत.

प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती

| अ.क्र. | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | रुग्णावर उपचार करणारे संबंधित डॉक्टर | अध्यक्ष |
| २ | ५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेले संबंधित चिकीत्सालयीन | सदस्य |
| ३ | विषयातील तज्ज्ञ डॉक्टर | सदस्य |

रुग्णाला उपचारार्थ ज्या रुग्णालयामध्ये दाखल केलेले असेल, त्या रुग्णालयात उक्त प्राथमिक वैद्यकीय समिती/मंडळाची स्थापना संस्थाप्रमुखांमार्फत करण्यांत यावी. तसेच प्राथमिक वैद्यकीय मंडळाने दिलेल्या प्राथमिक निर्णयाची अंमलबाजवणीकरीता लगेचच द्वितीय वैद्यकीय मंडळ/समिती स्थापित करण्यांची कार्यवाही संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

द्वितीय वैद्यकीय मंडळ/समिती

| अ.क्र. | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म. व रुग्णालय | अध्यक्ष |
| २ | ५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेले संबंधित चिकीत्सालयीन | सदस्य |
| ३ | विषयातील तज्ज्ञ डॉक्टर (प्राथमिक वैद्यकीय मंडळात सदस्य नसलेले) | सदस्य |

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, उक्तबाबत समिती स्थापन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ०७/०७/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत dmerabranch@gmail.com या मेल आयडीवर मेलद्वारे सादर करावा.

(अनिल भंडारी)
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रत:- मा.अपर मुख्य सचिव, वै.शि. व औ.द्र.वि., ९ वा मजला, गो.ते.रु.संकुल इमारत, मुंबई.

अत्यवस्थ रुग्णांचा औषधोपचार/जीवनसहाय्य उपकरणाने रुग्णांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्यास अशा रुग्णांना सन्मानाने मृत होण्याच्या हक्कांची मार्गदर्शक तत्वे, कार्यपध्दती याची अंमलबजावणीच्या अनुषंगाने न्यायनिर्णयानुसार संस्थास्तरावर प्राथमिक स्तर व द्वितीय स्तरावरील समिती स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१२२४/प्र.क्र.४५३/प्रशा-२**

०९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, संकुल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ डिसेंबर, २०२४

वाचा-

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. संवैशिवसं/Living Will/शैवि-७/२०२४/१५४५५, दिनांक ०४.१२.२०२४

**प्रस्तावना -**

रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील किरकोळ अर्ज क्र.१६९९/२०१९ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने अत्यवस्थ रुग्णांचे औषधोपचार/जीवनसहाय्य उपकरणानेही रुग्णांच्या परिस्थतीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्यास अशा रुग्णांना सन्मानाने मृत होण्याचा हक्क मिळण्यासाठी संबंधितांनी LIVING WILL करीता अर्ज केल्यास त्यांना तो हक्क देता येणे शक्य होणार आहे. तसेच LIVING WILL च्या संबंधित कार्यपध्दतीची अंमलबजावणी करीता मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे ए. एस. (रिट सेल) पी. आय. एल. क्र.३/२०२४ महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द जनहित याचिका दाखल आहे.

सदर LIVING WILL बाबतची कार्यपध्दती व अंमलबजावणीची कार्यपध्दती मा. न्यायालयाने निश्चित केलेली आहे. त्यामध्ये अत्यवस्थ रुग्णांचे औषधोपचार/जीवनसहाय्य उपकरणानेही रुग्णांच्या परिस्थतीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्यास अशा रुग्णांना LIVING WILL नुसार सन्मानाने मृत होण्याचा अधिकार बहाल करण्यांसाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन ४८ तासात निर्णय घेण्यांसाठी जबाबदार यंत्रणा निर्माण करणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २४/०१/२०२४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयातील परिच्छेद/मुद्दा क्र.१९८.४.४ ते १९८.४.७ व १९८.५.१ मध्ये नमूद केलेले आहे

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्देशाच्या पुर्तता करण्याच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारार्थ दाखल रुग्णांच्या Living Will संदर्भातील कार्यपध्दती व अंमलबजावणीसाठी

संस्थास्तरावर प्राथमिक स्तरावरील वैद्यकीय मंडळ व द्वितीय स्तरावरील वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्देशानुसार रुग्णांच्या Living Will वर मा. न्यायालयाने विहीत केलेल्या कार्यपध्दती व निर्देशानुसार ४८ तासांत कार्यवाही करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्यखाली शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात संस्थास्तरावर खालीलप्रमाणे प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती व द्वितीय वैद्यकीय मंडळ/ समितीची स्थापना करण्यात येत आहे.

प्राथमिक वैद्यकीय मंडळ/समिती

| अ.क्र. | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | रुग्णावर उपचार करणारे संबंधित डॉक्टर | अध्यक्ष |
| २ | ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले संबंधित चिकीत्सालयीन विषयातील तज्ज्ञ डॉक्टर (किमान २ सदस्य) | सदस्य |
| ३ | | सदस्य |

द्वितीय वैद्यकीय मंडळ/समिती

| अ.क्र. | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय | अध्यक्ष |
| २ | ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले संबंधित चिकीत्सालयीन विषयातील तज्ज्ञ डॉक्टर (प्राथमिक वैद्यकीय मंडळात/समितीत सदस्य नसलेले) (किमान २ सदस्य) | सदस्य |
| ३ | | सदस्य |

२. रुग्णाला उपचारार्थ ज्या रुग्णालयामध्ये दाखल केलेले असेल, त्या रुग्णालयात उक्त रुग्णांच्या Living Will च्या संदर्भात प्राथमिक वैद्यकीय समिती/मंडळाची स्थापना संबंधित संस्थेचे अधिष्ठाता करतील. तसेच, उक्त प्राथमिक वैद्यकीय समिती/मंडळाने दिलेल्या प्राथमिक निर्णयाची अमंलबजावणीकरीता लगेचच द्वितीय वैद्यकीय मंडळ/समिती स्थापित करण्याची कार्यवाही संबंधित अधिष्ठाता यानी करावी.

३. प्राथमिक व द्वितीय स्तरीय वैद्यकीय मंडळ/समिती संबंधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील काम पाहतील.

तसेच, प्राथमिक व द्वितीय वैद्यकीय मंडळात/समितीत आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ वाढविण्याचा अधिकार संबंधित अधिष्ठाता यांच्याकडे राहिल.

४. प्राथमिक व द्वितीय स्तरीय वैद्यकीय मंडळे/समिती या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०१.२०२४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयातील परिच्छेद मुद्दा क्र. १९८.४.४ ते १९८.४.७ व १९८.५.१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२१२१६४६००८७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO
GIRDHARI
JOGDAND

( म.गि.जोगदंड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (आयुक्त यांच्यामार्फत)
४. सरकारी अभियोक्ता (रिट सेल), मा. उच्च न्यायालय, मुंबई (आयुक्त यांच्यामार्फत).
५. निवडनस्ती (प्रशा-२).